# वर्ग १ :

**मासी कागद छुयो नहीं कलम गहो नहीं हाँथ ।**
**चारों जुग के महातम कबिरा मुखहिं जनाई बात ॥**

मी कधीच कागद आणि लेखणी हातात धरली नाही. चारही युगांचं शाश्वत सत्य मी थेट बोलूनच दाखवतो.

**जातिको जुलाहा मतिको धीर, हरषि हरषि गुन रमै कबीर ॥**

जातीने जरी मी जुलाहा (विणकर) असलो तरीदेखील मनाने अतिशय धैर्यवान आहे. हरीचे गुण गाण्यात मी आनंदाने रमून जातो.

**हरिको नाँव अभय-पद-दाता कहे कबीर कोरी ॥**

कबीर कोरी (विणकर) म्हणतो की हरीचे नामच माणसाला अभयपद मिळवून देऊ शकतं.

# वर्ग २ :

रामानंदांचे शिष्य आणि त्यांच्या शिष्यांचे ज्ञात शिष्य. सोबतच त्यांच्या जन्म-मृत्यूच्या तारखा आणि जन्म आणि मृत्यची स्थानं देखील नमूद केली आहेत.

| | | |
|---|---|---|
| रामानंद १३००-१३८० वाराणसी | अनंतानंद | |
| | सुरसुरानंद | |
| | सुखानंद | |
| | नरहरिदास १५०५-१६१० | तुलसीदास १५३२-१६२३ सोरोन |
| | भावानंद | |
| | भक्त पिपा १४२५ माळवा | |
| | सेन | |
| | धन्ना | |
| | सुरसुरी | |
| | पद्मावती | |
| | रोहिदास १४५०-१५२० वाराणसी | मीराबाई १४९८-१५४७ कुरकी, द्वारका |
| | कबीर १३९८-१४४०/१४४८-१५१८ वाराणसी, मगहर | भागोदास, धर्मदास, दादू दयाल १५४४-१६०३ अहमदाबाद, नरैना |

**जात-पात पूछें न कोई ।**
**हरि को भजे सो हरि का होई ॥ - रामानंद**

एकमेकांना जात का विचारता? जो हरीला स्मरतो, तो हरीचा होतो.

baithak company

# वर्ग ३ :

**हिन्दू आशै राम को, मुसलमान ख़ुदाई ।**
**जोगी आशै अलख को, तहा राम अच्छे न ख़ुदाई ॥ - संत गोरखनाथ**

हिंदूला रामदर्शनाची आशा असते आणि मुसलमानाला खुदाच्या. योगी तर अलखची साधना करतो जे राम आणि खुदा दोघांच्या पलीकडे आहे.

**न ब्रह्मा-विष्णु-रुद्रौ न सुरपतिसुरा नैव पृथ्वी नचापो**
**स्वज्योतिः स्वयमेकं जयति तव पदम् सच्चिदानंदमूर्ते - संत गोरखनाथ**

स्वतःच्या आतील ज्योती हीच सच्चिदानंद रुपी आहे. ब्रह्मा, विष्णू, शिव, देव-देवता, पृथ्वी आणि आकाश यांच्या कक्षेच्या ती बाहेर आहे.

**राम निरंजन न्यारा रे, अंजन सकल पसारा रे॥टेक॥**
**अंजन उतपति वो उंकार, अंजन मांड्या सब बिस्तार।**
**अंजन ब्रह्मा शंकर ईद, अंजन गोपी संगि गोब्यंद॥**
**अंजन बाणी अंजन बेद, अंजन कीया नांनां भेद।**
**अंजन विद्या पाठ पुरानं, अंजन फोकट कथाहिं गियानं॥**
**अंजन पाती अंजन देव, अंजन की करै अंजन सेव॥**
**अंजन नाचै अंजन गावै, अंजन भेष अनंत दिखावै।**
**अंजन कहौ कहाँ लग केता, दांन पुनि तप तीरथ जेता॥**
**कहै कबीर कोई बिरला जागै, अंजन छाड़ि निरंजन लागै॥**
**राम निरंजन न्यारा रे, अंजन सकल पसारा रे ॥**

केवळ निर्गुण रामच निरंजन आणि शाश्वत आहे. बाकी सगळं केवळ मायेचा खेळ.
सर्व उत्पत्ती, ओंकार, ब्रह्मा, इंद्र, शंकर, कृष्ण आणि त्याच्या गोपी सारंकाही अंजन आहे.

वेद, पुराण, जप, तप, ज्ञान, दान, पुण्य सर्व केवळ अंजन आणि निरर्थक आहे. अंजन नानाविध रूपांत आणि वेषांत प्रकट होतं. अंजन भेद निर्माण करतं. कबीर म्हणतात, क्वचितच कोणी अंजन सोडून निरंजनाची कास धरतो.

**सुनता है गुरु ज्ञानी गगन में आवाज हो रही झीनी-झीनी ॥**
**पहिले आए नाद बिंदु से पीछे जमया पानी हो जी ।**
**सब घट पूरण पूर रह्या है अलख पुरुष निर्बानी हो जी ॥**
**वहां से आया पता लिखाया तृष्णा तूने बुझाई बुझाई ।**
**अमृत छोड़सो विषय को धावे, उलटी फाँस फंसानी हो जी ॥**
**गगन मंडलू में गौ भी आनी भोई से दही जमाया जमाया ।**
**माखन माखन संतों ने खाया, छाछ जगत बापरानी हो जी ॥**
**बिन धरती एक मंडल दीसे, बिन सरोवर जूँ पानी रे ।**
**गगन मंडलू में होए उजियाला, बोल गुरु-मुख बानी हो जी ॥**
**ओऽहं सोऽहं बाजा बाजे त्रिकुटी धाम सुहानी रे ।**
**इड़ा पिंगला सुखमन नारी सून ध्वजा फेहरानी होजी ॥**
**कहे कबीरा सुनो भई साधो  जायी अगम की बानी रे ।**
**दिनभर रे जो नजरभर देखे  अजर अमर वो निशानी हो जी ॥**

ज्ञानी व्यक्ती सदैव गगन-मंडलातील अनहद नाद ऐकत असते.
विश्वाच्या सुरुवातीच्या देखील आधी जे तत्व अव्यक्तावस्थेत होतं, तेच तत्व निर्मितीनंतर प्रत्येक जीवात व्यक्त स्वरूपात अवतरलं आहे. सर्व विश्वप्रपंच म्हणजे अव्यक्तने स्वतःला व्यक्तपणे जाणून घेण्याचा खेळ/प्रयत्न आहे. परंतु व्यक्त होताच हे तत्व विषयांच्या अधीन होतं आणि विरुद्ध दिशेला प्रवास करु लागतं. ज्ञानाला घुसळून प्राप्त होणारं लोणी केवळ संतानाच मिळतं तर सामान्य माणसं आपली तहान ताकावरच भागवतात. हि पृथ्वी म्हणजे आपलं धाम नव्हे आणि या पाण्याने आपली खरी तहान शमणार नाही. गुरूच्या वाणीनेच भ्रम मिटतात आणि अंधकार लोप पावतो. जे काही अस्थित्वात आहे, ती माझीच रूपं आहेत हे जाणून योगी कालातीत शून्य अवस्थेत स्थिरावतो.  कबीर म्हणतात, तुमच्या आतली जी ज्योती सर्वकाही अविरतपणे बघते आहे तीच त्या परमज्योतीचा एक अंश आहे.

baithak
company

baithak
company